MHSN05000530-2011

## रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी १४७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम ह्या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. वादीना प्रतिवादी क्र.२० मयत झाल्याचे अलिकडेच समजून आल्याने त्यांना मुदतीत मयत प्रतिवादी क्र.२० चे वारस वेळेत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. परंतु, त्यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. तरी सदरचा झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी २० चे वारसांनी अर्जाच्या पाठिमागे म्हणणे दाखल केले असून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. परंतु, पुढे त्यांनी प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २,०००/- कॉस्टवर मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२० यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यास वादी पात्र आहेत पात्र आहे का? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**५.** अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी सरस निरस मानाने तुटक वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २० हे दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादींनी मयत प्रतिवादी यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणलेले नाहीत. परंतु, वादी-प्रतिवादी यांच्यातील वाद एकाच वेळी संपुष्टात आणण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.२० चे वारस रेकॉर्डवरती आणण्यासाठी झालेला विलंब माफ करणे न्यायाच्या दृष्टिने मंजूर करणे उचित होईल. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालीप्रमाणे आदेशः-

## आदेश

**१.** वादीचा अर्ज रक्कम रुपये २००/– कॉस्ट प्रतिवादी २० चे वारसांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

PANKAJA PRASAD AJGAONKAR

Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2023.09.16 17:00:47 +0530

इस्लामपूर — (पी.पी. आजगांवकर)

दिनांक १५.०९.२०२३ — ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

MHSN05000530-2011

## रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी १४८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाल्याने, प्रतिवादी क्र.२० विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम ह्या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र.२० यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वादींना मयत प्रतिवादी क्र.२० चे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. तरी सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जाकरीता प्रतिवादी २० चे वारसांनी निशाणी १४७ वरील अर्जाच्या पाठिमागे म्हणणे दाखल केले असून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. परंतु, पुढे त्यांनी प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २,०००/- कॉस्टवर मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळणेस वादी पात्र आहे का ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५.        अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी सरस निरस मानाने तुटक वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम ह्या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.२० यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झालेला आहे. हे दिलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता वादीनी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याबाबतचा झालेला विलंब माफ केलेला आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालीप्रमाणे आदेशः-

## आदेश

१.    वादीचा अर्ज रक्कम रुपये १००/– कॉस्ट प्रतिवादी २० चे वारसांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

PANKAJA PRASAD AJGAONKAR
Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2023.09.16 17:00:59 +0530

इस्लामपूर                                        (पी.पी. आजगांवकर)

दिनांक १५.०९.२०२३                        ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

MHSN05000530-2011

<u>रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी १४९ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी व वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम ह्या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याचे टायटल पेजवर प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे नांवासमोर 'मयत' असे वाचणेत येऊन वारसांची नांवे लिहिणेस परवानगी मिळावी. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जाकरीता प्रतिवादी २० चे वारसांनी निशाणी १४७ वरील अर्जाच्या पाठिमागे म्हणणे दाखल केले असून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी परवानगी मिळणेस वादी पात्र आहे का? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने तुटक वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम ह्या दिनांक २०.०९.२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीना मयत प्रतिवादी यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झालेला आहे. हे दिलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता वादीनी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे त्याबाबतचा झालेला विलंब माफ केला आहे व अबेटमेंट आदेश रद्दबातल होऊन मिळणेचा अर्ज देखील मंजूर करण्यात आला आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे, करिता, खालीप्रमाणे आदेशः-

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२० सावित्री रामचंद्र कदम यांचे वारसांची नांवे अभिलेखावर घेण्यात यावीत.

३. वादीने मागितलेली दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

PANKAJA PRASAD AJGAONKAR
Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2023.09.16 17:00:39 +0530

इस्लामपूर (पी.पी. आजगांवकर)

दिनांक १५.०९.२०२३ ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

| - : C E R T I F I C A T E : - | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order. | | |
| Name of Stenographer | :- | S.N. Pethkar |
| Court Name | :- | P. P. Ajgaonkar<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 15.09.2023 |
| Order signed by PO. on | :- | 15.09.2023 |
| Order uploaded on | :- | 16.09.2023 |